नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे | Year - 4rd | अंक - ७ | Issue - 7 | वार - सोमवार दि. १ जून २०२६ | Blow- Monday Date 1 JUNE 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये

### हवामान विभागाकडून आवाहन; मान्सूनपूर्व अवकाळीचा इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील हवामानात सध्या मोठ्या प्रमाणावर बदल होण्यास सुरुवात झाली आहे. मे महिन्यातील कडक उन्हाच्या झळांनंतर आता १ जून पासून सुरू होणाऱ्या नवीन आठवड्यात हवामानाचा नूर अधिकच बदलणार आहे. हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार, राज्यातील अनेक भागांमध्ये वादळी पावसाची दाट शक्यता आहे. मात्र, हा पाऊस मान्सूनचा नसून मान्सूनपूर्व वादळी पाऊस आहे. सद्यस्थितीनुसार, राज्यातील बहुतांश भागांमध्ये किमान १० जून पर्यंत अधिकृत मान्सूनच्या आगमनाची कोणतीही शक्यता नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये, असं आवाहन हवामान खात्याने केलं आहे.



हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार, १ जूनपासून राज्यातील प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा, मध्य महाराष्ट्र आणि खानदेशात दुपारनंतर हवामानात मोठे बदल होऊन ढगाळ वातावरण निर्माण होईल. या भागात काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळी पाऊस पडण्याची शक्यता आहे. याशिवाय, कोकण किनारपट्टीच्या भागातही काही प्रमाणात पावसाच्या सरी कोसळतील असा अंदाज आहे. मे महिन्याच्या अत्यंत कडक आणि सुस्त करणाऱ्या उन्हाच्या तुलनेत आता आगामी आठवड्यात राज्यातील कमाल तापमानात काहीशी घट होणार आहे, ज्यामुळे नागरिकांना उकाड्यापासून थोडा दिलासा मिळेल. मात्र, विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये, प्रामुख्याने पूर्व विदर्भात कमाल तापमान अद्यापही ४० अंश सेल्सिअसच्या वरच कायम राहण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने स्पष्ट केले आहे की, आगामी काळात होणाऱ्या वादळी पावसाचा मान्सूनशी कोणताही थेट संबंध नाही, कारण मान्सून अद्याप केरळमध्येच दाखल झालेला नाही. आगामी हवामान बदल आणि मान्सून विलंबाने येण्याची शक्यता लक्षात घेऊन कृषी विभाग आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाने शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाची मार्गदर्शक नियमावली जाहीर केली आहे. शेतकऱ्यांनी १ जूनपासून सुरू होणाऱ्या केवळ मान्सूनपूर्व वादळी पावसावर अवलंबून राहून आपल्या शेतात पेरणीची घाई करू नये. मान्सूनचे अधिकृत आगमन होऊन पुरेसा पाऊस पडल्याशिवाय पेरणी केल्यास बियाणे वाया जाण्याची भीती असते.

विजांपासून स्वतःचे रक्षण करा : विजेच्या कडकडाटासह पाऊस सुरू असताना नागरिक आणि शेतकऱ्यांनी स्वतःची तसेच आपल्या पाळीव जनावरांची सुरक्षा सुनिश्चित करावी.

'या' ठिकाणी उभे राहू नका : विजा चमकत असताना विनाकारण घराबाहेर पडणे टाळावे. तसेच कोणत्याही मोठ्या झाडाखाली, टिनशेडखाली, विद्युत ट्रान्सफॉर्मर, वीज खांब आणि उघड्या विद्युत वाहिन्यांच्या जवळ उभे राहणे पूर्णपणे टाळावे.

## राजस्थानमध्ये वादळ पुन्हा येण्याची शक्यता, ८० किमी प्रतितास वेगाने वारे वाहणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : देशात वेगवेगळ्या ठिकाणी हवामानात वेगाने बदल होताना दिसत आहेत. हवामान विभागाने केलेल्या संशोधनात फार महत्त्वाची माहिती समोर आली आहे. भारताच्या उत्तर-पश्चिम भागात वातावरणात मोठा बदल होण्याची शक्यता आहे. राजस्थानमध्ये तब्बल ८० किमी प्रतितास वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. यामुळे हवामान विभागाकडून सर्वसामान्यांना काळजी घेण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. देशाची राजधानी असलेल्या दिल्लीतही वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. तसेच हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये डोंगराळ भागात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे.



राजस्थानमध्ये धुळीचे भयानक वादळ बघायला मिळालं. यानंतर आता हवामान विभागाकडून पुन्हा असा इशारा देण्यात आला आहे. राजस्थानच्या वाळवंटी प्रदेशात ८० किमी प्रतितास वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. इथे वातावरण पुन्हा रौद्र रुप धारण करण्याची शक्यता आहे. राजस्थानमध्ये पुन्हा धुळीचे मोठे वादळ येण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे धुळीचे वादळ हे दिल्ली आणि पंजाबमध्ये देखील येण्याची शक्यता आहे. याच वेळी उत्तराखंड आणि हिमाचल प्रदेशात बर्फवृष्टी होण्याची शक्यता आहे.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, आगामी काही दिवसांमध्ये राजस्थानमध्ये धुळीचे वादळ येण्याची शक्यता आहे. यावेळी वाऱ्याचा वेग हा ताशी ८० किमी इतका असण्याची शक्यता आहे. तर दिल्लीत ४० ते ५० किमी प्रतितास वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. याचवेळी विजांचा कडकडाट आणि ढगांच्या गडगडाटासह पावसाची शक्यता आहे. पंजाब, हरियाणा, जम्मू-काश्मीर इथे देखील वादळी पावसाची शक्यता आहे. उत्तराखंड आणि हिमाचल प्रदेशात उंचावरच्या भागात बर्फवृष्टी आणि मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तर दक्षिणेत आंध्र प्रदेशाच्या किनारी भागात वाऱ्याचा वेग हा ताशी ७० किमी इतका असण्याची शक्यता आहे.

एकीकडे महाराष्ट्रात चंद्रपूरमध्ये सर्वाधिक ४४.८ डिग्री सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. तर देहरादूनला १७ डिग्री सेल्सिअस सर्वात कमी तापमानाची नोंद झाली आहे. एकीकडे मान्सून हा केरळ, तामिनळनाडू आणि लक्षद्वीपच्या दिशेला सरकत आहे.

## भावगीतांची सम्राज्ञी हरपली! ज्येष्ठ गायिका सुमन कल्याणपूर यांचे निधन; संगीत क्षेत्रावर शोककळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : संगीत जगतातून अत्यंत दुःखाची आणि मनाला चटका लावणारी बातमी समोर आली आहे. आपल्या मधुर आणि सुश्राव्य आवाजानं रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या ज्येष्ठ गायिका सुमन कल्याणपूर यांचं निधन झालं आहे. वयाच्या ८९ व्या वर्षी मुंबईतील राहत्या घरी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनानं भारतीय संगीत क्षेत्रातील एका सुवर्ण युगाचा अंत झाला असून संगीत विश्वावर शोककळा पसरली आहे. मराठी भावगीत, भक्तीगीत आणि हिंदी चित्रपट संगीतात त्यांनी दिलेले योगदान कधीही न विसरता येणारं आहे. कला क्षेत्रातील त्यांच्या अफाट कामगिरीची दखल घेऊन केंद्र सरकारने २०२३ साली त्यांना 'पद्मभूषण' या नागरी पुरस्काराने सन्मानित केलं होतं.

सुमन कल्याणपूर यांचा जन्म २८ जानेवारी १९३७ रोजी बांगलादेशातील (तत्कालीन अविभाजित भारत) भवानीपूर येथे झाला होता. लहानपणापासूनच त्यांना संगीताची प्रचंड आवड होती. त्यांनी संगीताचा अतिशय कसून आणि सखोल अभ्यास केला होता. सुमनजींचे माहेरचे आडनाव 'हेमाडी' असे होते. त्यामुळे लग्नापूर्वी त्या सिनेसृष्टीत 'सुमन हेमाडी' या नावानेच गाणी गात असत आणि याच नावाने त्यांची सुरुवातीची गाणी लोकप्रिय झाली. मराठी भावगीत गायनाची त्यांची सुरुवात ग. दि. माडगुळकर यांच्या अजरामर गीतांनी झाली.


पहिलं गाणं : रुपेरी पडद्यावरचं सुमन कल्याणपूर यांचं पहिलं गाणं 'कोई पुकारे धीरेसे तुझे आँख के तारे' हे होतं. या गाण्याने रसिकांना त्यांच्या आवाजाची भुरळ पाडली.

## मराठवाड्यासह विविध जिल्ह्यात पावसाची हजेरी; कुठे गारा, कुठे वादळवारा, उकाड्यापासून नागरिकांना सुटका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात मान्सूनपूर्व पावसाने हजेरी लावली असून विविध जिल्ह्यात कुठे वादळवारा तर कुठे गारांचाही पाऊस झाला आहे. दिवसभराच्या कडक उन्हानंतर संध्याकाळी अचानक सोसाट्याच्या वाऱ्यासह चंद्रपूर शहर आणि जिल्ह्यात बरसल्या पावसाच्या हलक्या सरी बसरल्या आहेत.

गेले अडीच महिने अतिशय तीव्र उन्हामुळे चंद्रपूर जिल्हा अक्षरशः होरपळून निघालाय. त्यातच आज संध्याकाळी वातावरणात अचानक बदल झाला आणि सोसाट्याच्या वाऱ्यासह पावसाला सुरुवात झाली. सुमारे अर्धा तास हा हलक्या स्वरूपाचा पाऊस पडलाय. त्यामुळे उन्हाच्या काहिलीपासून नागरिकांना हा पाऊस दिलासादायक ठरला. चंद्रपूर जिल्ह्यातील सर्वच तालुक्यात हा



पाऊस बरसत असल्याची माहिती मिळाली आहे. आगामी काळातही अशाच पद्धतीने पाऊस बरसत रहावा अशीच चंद्रपूरकरांची अपेक्षा आहे.

नाशिकमध्ये गेल्या काही दिवसांपासून प्रचंड उकाडा आणि वाढलेल्या तापमानाने हैराण झालेल्या नागरिकांना अखेर मान्सूनपूर्व पावसाने दिलासा दिला आहे. नांदगाव, मनमाड शहरासह ग्रामीण भागात अचानक ढगाळ वातावरण तयार होऊन वादळी वारा, विजांच्या कडकडाटासह हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला. त्यामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून नागरिकांनीही काहीसा सुटकेचा श्वास घेतला. या अवकाळी स्वरूपाच्या मान्सूनपूर्व पावसामुळे शेतीच्या कामांना सुरुवात होण्यास मदत मिळणार आहे..अनेक भागात शेतजमिनी ओलावल्याने मशागतीच्या कामांना गती मिळण्याची शक्यता आहे. जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव व भडगाव तालुक्यात आज सायंकाळी अचानक वातावरणात बदल होऊन वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला. सायंकाळी काळे ढग दाटून आले आणि विजांच्या कडकडाटासह पावसाला सुरुवात झाली. बीड तालुक्यातील लिंबागणेश परिसरातही सायंकाळच्या सुमारास वादळी वाऱ्यासह दमदार पावसाने हजेरी लावली. या पावसाने वातावरणात गारवा निर्माण झाल्याने दिलासा मिळालाय. दुसरीकडे मसेवाडी येथील शेतकऱ्यांच्या घरावरील पत्रे उडून गेल्याची घटना समोर आलीय. जोरदार वादळी वाऱ्यामुळे घरावरील पत्रे उडून गेल्याने शेतकरी कुटुंब उघड्यावर आले आहे. बीडमध्ये दुपारपासूनच गारवा निर्माण झाला होता. त्यानंतर सायंकाळच्या सुमारास परिसरात दमदार पाऊस झाला. तर तर अजूनही काही भागात हलक्या पावसाच्या सरी कोसळत आहेत.

**श्रीक्षेत्र चौंडीत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा ३०१ वा जयंती महोत्सव**

**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

## अहिल्यादेवींच्या विचारांचा वारसा समाजाने अंगीकारण्याची गरज

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अहिल्यानगर : छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्याच्या मूल्यांचा प्रसार अहिल्यादेवींनी आपल्या कार्यातून देशभर केला. त्यांनी अंधश्रद्धेला कधीही थारा दिला नाही आणि समाजाला योग्य दिशा दाखविण्याचे कार्य केले. त्यांच्या विचारांचा वारसा अंगीकारण्याची समाजाला गरज आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंती महोत्सवात उपमुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. याप्रसंगी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, खासदार रामराव वडकुते, आमदार सर्वश्री काशिराम दाते, मोनिका राजळे, सुनील कर्जतकर, गोपीचंद पडळकर, विठ्ठलराव लंघे, किरण लहामटे, हेमंत ओगले, अमोल खताळ, अक्षय कर्डिले, उत्तमराव जानकर, नारायण पाटील, बाबासाहेब देशमुख, सचिन कांबळे, तसेच माजी मंत्री अण्णासाहेब डांगे आदी उपस्थित होते.



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, आजचा दिवस ऐतिहासिक आहे. महाराष्ट्राचा अभिमान, शौर्य, त्याग व समर्पण यांचे मूर्तिमंत प्रतीक म्हणजे अहिल्यादेवी होळकर होत. चौंडीची माती त्यांच्या जन्माने पावन झाली आहे. त्या न्यायप्रियता आणि शक्तीचे प्रतीक असलेल्या युगप्रवर्तक होत्या. त्यांचा राज्यकारभार आदर्शवत होता. जनतेवर त्यांनी आईप्रमाणे माया केली. तीनशे वर्षांनंतरही देश त्यांचे स्मरण करत आहे. त्यांनी मानवधर्म जपला. अहिल्यादेवींनी अनेक वैयक्तिक आघात सहन केले; मात्र त्यातून खचून न जाता आदर्श राज्यकारभाराचा वस्तुपाठ घालून दिला. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचे कार्य आपल्याला करायचे आहे. गोदा ते नर्मदा अहिल्यादेवी जलयात्रा शासनाने आयोजित केली. अहिल्यादेवी या दूरदृष्टी असलेल्या राज्यकर्त्या होत्या. त्यांनी समाजाच्या रक्षणासाठी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले.

अहिल्यादेवी या हिंदुत्वाचा हुंकार व शौर्याचे प्रतीक होत्या. त्यांची न्यायप्रियता, लोककल्याणकारी राज्यकारभार व जनसेवेचा वारसा आपल्यासाठी आदर्श आहे. त्यांनी सत्तेपेक्षा सेवेला आणि वैभवापेक्षा जनकल्याणाला प्राधान्य दिले. आपल्या कार्यकाळात देशभरात मंदिरे, घाट, धर्मशाळा व जलसंवर्धनाची अनेक कामे उभी केली. जलसंवर्धन क्षेत्रातील त्यांचे कार्य आजही मार्गदर्शक ठरते. त्यांच्या कार्याचे स्मरण म्हणून जलसंवर्धनाचे विविध उपक्रम राबविले जात आहेत. कुटुंबातील सदस्यांच्या निधनाचे मोठे आघात सहन करूनही त्यांनी स्वतःचे दुःख बाजूला ठेवत कर्मयोगी वृत्तीने जनसेवा केली, असेही उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या, अहिल्यादेवी होळकर यांनी २८ वर्षे आदर्श राज्यकारभार केला. त्यांनी न्यायदानाची भक्कम व्यवस्था उभी केली. देशभरातील धार्मिक स्थळांचा जीर्णोद्धार स्वतःच्या निधीतून केला. राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि सांस्कृतिक क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केले. समाजातील दुर्बल घटकांच्या कल्याणासाठी कार्य करताना त्यांनी लोकसेवा आणि जनहिताला सर्वोच्च प्राधान्य दिले. त्यामुळेच त्यांचे कार्य आजही आदर्शवत मानले जाते. माहेश्वरी वस्त्रउद्योगाला चालना देऊन रोजगारनिर्मिती केली. तसेच महिलांच्या सक्षमीकरणासाठी स्वतंत्र महिला सैन्य तुकडी उभारण्याचा दूरदृष्टीपूर्ण निर्णय घेतला.

त्या पुढे म्हणाल्या, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी स्वतःसाठी धनखर्च न करता समाजकल्याणासाठी संपत्तीचा उपयोग केला. त्यामुळेच त्यांना 'लोकमाता' म्हणून ओळखले जाते. गोदा ते नर्मदा या अहिल्यादेवी जलयात्रेचा शुभारंभ यावर्षी चौंडी येथून करण्यात आला.

प्रास्ताविकात विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे म्हणाले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीचे विशेष महत्त्व आहे. जयंती महोत्सवानिमित्त तीन दिवस विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी आयुष्यभर लोककल्याण, न्यायनिष्ठ प्रशासन आणि समाजहितासाठी कार्य केले. त्यांच्या कार्यातून समाजाला आजही प्रेरणा मिळते. प्रत्येकाने त्यांच्या विचारांचा आणि कार्यपद्धतीचा आदर्श घेऊन समाजहितासाठी योगदान देण्याची गरज आहे.

कृषिमंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या लोककल्याणकारी कार्यामुळे आजही संपूर्ण समाजाला प्रेरणा मिळत आहे. चौंडी ही केवळ त्यांची जन्मभूमी नसून प्रेरणास्थळ आहे. त्यांनी समाजातील सर्व घटकांच्या कल्याणासाठी केलेले कार्य आजही मार्गदर्शक आहे. त्यांच्या विचारांचा आदर्श घेऊन समाजाच्या विकासासाठी व सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी कार्य करण्याची आवश्यकता आहे.

यावेळी खासदार रामराव वडकुते, आमदार गोपीचंद पडळकर आणि माजी मंत्री अण्णासाहेब डांगे यांनीही मनोगत व्यक्त केले.

## संपादकीय....

# अवकाळी

सद्यस्थितीनुसार, राज्यातील बहुतांश भागांमध्ये किमान १० जून पर्यंत अधिकृत मान्सूनच्या आगमनाची कोणतीही शक्यता नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये, असं आवाहन हवामान खात्याने केलं आहे. दरम्यान राज्यात मान्सूनपूर्व पावसाने हजेरी लावली असून विविध जिल्ह्यात कुठे वादळवारा तर कुठे गारांचाही पाऊस झाला आहे. दिवसभराच्या कडक उन्हानंतर संध्याकाळी अचानक सोसाट्याच्या वाऱ्यासह चंद्रपूर शहर आणि जिल्ह्यात बरसल्या पावसाच्या हलक्या सरी बसरल्या आहेत. गेले अडीच महिने अतिशय तीव्र उन्हामुळे चंद्रपूर जिल्हा अक्षरशः होरपळून निघालाय. त्यातच आज संध्याकाळी वातावरणात अचानक बदल झाला आणि सोसाट्याच्या वाऱ्यासह पावसाला सुरुवात झाली. सुमारे अर्धा तास हा हलक्या स्वरूपाचा पाऊस पडलाय. त्यामुळे उन्हाच्या काहिलीपासून नागरिकांना हा पाऊस दिलासादायक ठरला. चंद्रपूर जिल्ह्यातील सर्वच तालुक्यात हा पाऊस बरसत असल्याची माहिती मिळाली आहे. नाशिकमध्ये गेल्या काही दिवसांपासून प्रचंड उकाडा आणि वाढलेल्या तापमानाने हैराण झालेल्या नागरिकांना अखेर मान्सूनपूर्व पावसाने दिलासा दिला आहे. नांदगाव, मनमाड शहरासह ग्रामीण भागात अचानक ढगाळ वातावरण तयार होऊन वादळी वारा, विजांच्या कडकडाटासह हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला. त्यामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून नागरिकांनीही काहीसा सुटकेचा श्वास घेतला. या अवकाळी स्वरूपाच्या मान्सूनपूर्व पावसामुळे शेतीच्या कामांना सुरुवात होण्यास मदत मिळणार आहे.

# धक्कादायक! प्रसूतीनंतर डॉक्टरांनी महिलेच्या पोटातच विसरली शस्त्रक्रियेची पट्टी, मुंबईच्या रुग्णालयातील प्रकार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : दक्षिण मुंबईतील पायधूनी भागातून वैद्यकीय हलगर्जीपणाचा एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. प्रसुतीकरता मोहम्मद अली रोडवरील नूर रूग्णालयात दाखल झालेल्या एका महिलेच्या पोटात डिलिव्हरी दरम्यान ऑपरेशनकरता वापरला जाणारा कॉटन गॉझचा एक तुकडा तसाच राहिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

नेमकी घटना काय? : दक्षिण मुंबईच्या पायधुनी परिसरात वैद्यकीय निष्काळजीपणाचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. मोहोम्मद अली रोडवरील नूर रुग्णालयात १० मे रोजी एका महिलेची प्रसूती डॉ. आनम सय्यद यांच्या देखरेखीखाली झाली. त्यानंतर १४ मे रोजी तिला डिस्चार्ज देण्यात आला. डिस्चार्जनंतर काही दिवसांतच महिलेला ताप, पोटदुखी सुरू झाली. पुन्हा रुग्णालयात गेल्यावर तिला सामान्य उपचार देण्यात आले, मात्र त्रास वाढतच गेला. यानंतर कुटुंबीयांनी इतर रुग्णालयात तपासणी केली. सिटी स्कॅनमध्ये धक्कादायक बाब समोर आली. प्रसूतीदरम्यान वापरलेला कॉटन गॉझचा तुकडा महिलेच्या पोटातच राहिल्याचं निष्पन्न झालं. सध्या या प्रकरणामुळे रुग्णालयाच्या निष्काळजीपणावर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

चूक लक्षात येताच नूर रूग्णालयाकडून लपवाछपवीचा प्रयत्न : चूक लक्षात येताच नूर रुग्णालयाकडून संबंधित महिलेला पुन्हा दाखल करून घेण्यात आलं. त्यानंतर तिच्या पतीला एक इंजेक्शन आणण्यासाठी बाहेर पाठवण्यात आलं आणि लगेचच पत्नीवर तातडीनं ऑपरेशन करावं लागेल, असा फोन त्याला करण्यात आला. या प्रकारामुळे पतीला संशय आला. त्यानं डॉक्टरांकडे याची विचारणा करत वैद्यकीय अहवालांची मागणी केली. तेव्हा त्याला उलट-सुलट उत्तर देऊन कोणतंही स्पष्टीकरण देण्यास टाळाटाळ सुरू केली. पतीनं त्यानंतर लागलीच रुग्णालय गाठून पत्नीचे सर्व रिपोर्ट मिळवले. मिळालेले रिपोर्ट त्यानं दुसऱ्या एका ओळखीच्या डॉक्टरला पाठवले, तेव्हा त्यांनी खरा प्रकार त्यांना समजावून सांगितला.

पोलिसांकडून कठोर कारवाईचं आश्वासन : खरा प्रकार समजताच पती शमसाद अली सय्यद यांनी ऑपरेशन तत्काळ थांबवून पायधुनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी प्रकरणाचं गांभीर्य लक्षात घेऊन आधी रुग्णावर तातडीनं उपचार करण्याचा सल्ला दिला. त्यानंतर शुक्रवारी रात्री पुन्हा शस्त्रक्रिया करण्यात आली आणि पोटात राहिलेला कॉटन गॉझचा तुकडा बाहेर काढण्यात आला. सध्या महिलेची प्रकृती स्थिर असून पोलिसांकडून संबंधित डॉक्टर आणि रुग्णालयावर कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू आहे.

# पालक : जीवनाचे पहिले विद्यापीठ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दरवर्षी १ जून हा दिवस संपूर्ण जगात 'जागतिक पालक दिन' म्हणून साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्र संघाने २०१२ मध्ये या दिवसाला अधिकृत मान्यता देत जगभरातील पालकांच्या योगदानाचा गौरव करण्याचा निर्णय घेतला. या दिवसामागील मूलभूत उद्देश म्हणजे पालकांनी आपल्या मुलांच्या संगोपनासाठी, शिक्षणासाठी, संरक्षणासाठी आणि उज्ज्वल भविष्यासाठी केलेल्या निःस्वार्थ त्यागाचे स्मरण करणे होय. मानवी जीवनाच्या जडणघडणीत पालकांची भूमिका इतकी महत्त्वपूर्ण असते की त्याशिवाय कोणत्याही व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाची कल्पनाही करता येत नाही. व्यक्तीच्या जन्मापासून ते तिच्या आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यापर्यंत पालकांचे प्रेम, मार्गदर्शन, त्याग आणि प्रेरणा तिच्यासोबत असते. त्यामुळेच पालक हे केवळ जन्मदाते नसून जीवनाचे शिल्पकार, संस्कारांचे निर्माते आणि व्यक्तिमत्त्वाचे खरे घडवणारे असतात.

मानवी समाजात कुटुंब ही सर्वांत प्राचीन आणि महत्त्वाची सामाजिक संस्था मानली जाते. या संस्थेच्या केंद्रस्थानी पालक असतात. कुटुंबातील आई-वडील हे मुलांच्या जीवनातील पहिले शिक्षक, पहिले मार्गदर्शक आणि पहिले आदर्श असतात. बालक जेव्हा या जगात येते तेव्हा त्याला कोणतीही भाषा, ज्ञान किंवा सामाजिक नियम माहिती नसतात. हळूहळू तो आपल्या पालकांकडून बोलणे, चालणे, विचार करणे, वागणे आणि समाजाशी जुळवून घेणे शिकत असतो. मुलांच्या जीवनातील पहिली शाळा म्हणजे त्यांचे घर आणि पहिले शिक्षक म्हणजे त्यांचे पालक. त्यामुळे मुलांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत पालकांची भूमिका अत्यंत मूलभूत आणि निर्णायक असते.

भारतीय संस्कृतीमध्ये पालकांना देवतुल्य स्थान देण्यात आले आहे. आईला प्रथम गुरु मानले जाते, कारण बालकाच्या जीवनातील पहिला संस्कार तिच्याकडूनच होतो. आईच्या मायेचा स्पर्श, तिचे वात्सल्य, तिची ममता आणि तिचा त्याग हे शब्दांत व्यक्त करणे अशक्य आहे. मूल नऊ महिने आपल्या उदरात वाढविण्यापासून ते त्याच्या प्रत्येक गरजेची पूर्तता करण्यापर्यंत आई अनेक संकटांचा सामना करत असते. दुसरीकडे वडील हे कुटुंबाचा आधारस्तंभ असतात. कुटुंबाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी ते आयुष्यभर परिश्रम घेतात. मुलांच्या शिक्षणासाठी, आरोग्यासाठी आणि भविष्याच्या सुरक्षिततेसाठी ते सतत झटत असतात. आई आणि वडील या दोघांच्या प्रेम, त्याग आणि समर्पणामुळेच मुलांचे जीवन घडत असते.

पालकत्व ही केवळ जैविक जबाबदारी नसून ती एक सामाजिक, नैतिक आणि भावनिक बांधिलकी आहे. मूल जन्माला घालणे सोपे असले तरी त्याला योग्य प्रकारे वाढविणे, संस्कार देणे आणि सक्षम नागरिक बनविणे हे मोठे आव्हान असते. पालक आपल्या मुलांसाठी अनेक स्वप्ने पाहतात आणि ती पूर्ण करण्यासाठी आयुष्यभर मेहनत घेतात. अनेक वेळा स्वतःच्या इच्छा, आकांक्षा आणि सुखसोयींचा त्याग करून ते आपल्या मुलांच्या भविष्यासाठी संघर्ष करत असतात. मुलांचे यश पाहून त्यांना मिळणारा आनंद हा त्यांच्या आयुष्यातील सर्वांत मोठा पुरस्कार असतो. म्हणूनच पालकांचे प्रेम हे निःस्वार्थ, निरपेक्ष आणि शाश्वत मानले जाते.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले तर व्यक्तीच्या सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेत पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. सामाजिकीकरण म्हणजे व्यक्तीला समाजातील मूल्ये, नियम, परंपरा आणि संस्कृती शिकविण्याची प्रक्रिया होय. ही प्रक्रिया सर्वप्रथम घरातून सुरू होते. मुलांमध्ये प्रामाणिकपणा, शिस्त, सहकार्य, करुणा, आदर, सहिष्णुता आणि सामाजिक जबाबदारी यांसारख्या मूल्यांची रुजवात पालकच करतात. मुलांनी समाजात जबाबदार नागरिक म्हणून वावरावे यासाठी आवश्यक असलेले नैतिक शिक्षण त्यांना घरातूनच मिळते. त्यामुळे समाजातील चांगल्या किंवा वाईट प्रवृत्तींच्या निर्मितीत पालकांच्या भूमिकेचे विशेष महत्त्व आहे.

आजच्या आधुनिक युगात विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे जीवनशैलीत मोठे बदल झाले आहेत. इंटरनेट, स्मार्टफोन, सामाजिक माध्यमे आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांसारख्या तंत्रज्ञानामुळे माहितीचे जग मुलांसाठी खुले झाले आहे. या बदलांमुळे अनेक संधी निर्माण झाल्या असल्या तरी अनेक नवीन आव्हानेही निर्माण झाली आहेत. मुलांच्या मानसिक, सामाजिक आणि नैतिक विकासावर तंत्रज्ञानाचा वाढता प्रभाव दिसून येत आहे. अशा परिस्थितीत पालकांची जबाबदारी अधिक वाढली आहे. मुलांना तंत्रज्ञानाचा योग्य वापर शिकविणे, त्यांना चुकीच्या माहितीपासून दूर ठेवणे आणि डिजिटल जगातील धोक्यांविषयी जागरूक करणे हे पालकांसाठी अत्यावश्यक झाले आहे.

आजच्या स्पर्धात्मक युगात अनेक पालक आपल्या मुलांना उत्कृष्ट शिक्षण आणि उत्तम करिअर मिळावे यासाठी प्रयत्नशील असतात. परंतु अनेकदा या प्रयत्नांमध्ये मुलांवर अनावश्यक अपेक्षांचे ओझे टाकले जाते. प्रत्येक मुलाची क्षमता, बुद्धिमत्ता, आवड आणि व्यक्तिमत्त्व वेगळे असते. त्यामुळे मुलांची तुलना इतरांशी करणे किंवा त्यांच्याकडून अवास्तव अपेक्षा ठेवणे योग्य नाही. पालकांनी मुलांच्या क्षमतांचा आदर करून त्यांना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात प्रोत्साहन दिले पाहिजे. मुलांना यशाइतकेच अपयश स्वीकारण्याची ताकद देणेही तितकेच महत्त्वाचे आहे. कारण जीवनात यश आणि अपयश हे दोन्ही अपरिहार्य आहेत.

मुलांच्या मानसिक आरोग्याच्या दृष्टीने पालकांची भूमिका विशेष महत्त्वाची ठरते. वाढती स्पर्धा, शैक्षणिक ताण, सामाजिक दबाव आणि डिजिटल माध्यमांचा प्रभाव यामुळे अनेक मुले मानसिक तणावाचा सामना करत आहेत. काही वेळा नैराश्य, चिंता, एकाकीपणा आणि आत्मविश्वासाचा अभाव यांसारख्या समस्या निर्माण होतात. अशा परिस्थितीत पालकांनी मुलांचे मित्र बनून त्यांना भावनिक आधार देणे आवश्यक असते. मुलांच्या भावना समजून घेणे, त्यांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेणे आणि त्यांना योग्य मार्गदर्शन करणे हे सुदृढ पालकत्वाचे लक्षण आहे. प्रेम आणि विश्वास यांच्या आधारे निर्माण झालेले नाते मुलांच्या मानसिक आरोग्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरते.

शिक्षण क्षेत्रात पालकांचे योगदान अनन्यसाधारण आहे. शाळा, महाविद्यालये आणि शिक्षक ज्ञान देतात; परंतु शिक्षणाविषयी सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्याचे कार्य पालक करतात. मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे, अभ्यासासाठी अनुकूल वातावरण उपलब्ध करून देणे आणि जिज्ञासू वृत्तीला प्रोत्साहन देणे हे पालकांचे महत्त्वाचे कार्य आहे. संशोधनातून असे दिसून आले आहे की ज्या मुलांच्या शिक्षणात पालकांचा सक्रिय सहभाग असतो, त्या मुलांची शैक्षणिक प्रगती अधिक चांगली होते. त्यामुळे शिक्षण प्रक्रियेत पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची मानली जाते.

भारतीय समाजात कुटुंबव्यवस्थेला विशेष महत्त्व आहे. पूर्वी संयुक्त कुटुंब पद्धतीमुळे मुलांच्या संगोपनात आजी-आजोबा, काका-काकू आणि इतर नातेवाईकांचा सहभाग असायचा. या वातावरणात मुलांना विविध अनुभव आणि संस्कार मिळत असत. परंतु शहरीकरण, औद्योगिकीकरण आणि स्थलांतरामुळे विभक्त कुटुंब पद्धती वाढत आहे. परिणामी पालकांवर मुलांच्या संगोपनाची संपूर्ण जबाबदारी येत आहे. या बदलत्या परिस्थितीत पालकांनी मुलांना कौटुंबिक मूल्यांची जाणीव करून देणे आणि नातेसंबंधांचे महत्त्व समजावून सांगणे आवश्यक झाले आहे.

स्त्री-पुरुष समानतेच्या दृष्टीने पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. मुलगा आणि मुलगी यांच्यात कोणताही भेदभाव न करता दोघांनाही समान संधी देणे ही काळाची गरज आहे. शिक्षण, आरोग्य, करिअर आणि निर्णयप्रक्रियेत समानता राखल्यास समाज अधिक प्रगत आणि न्याय्य बनू शकतो. मुलींना शिक्षणासाठी आणि स्वावलंबनासाठी प्रोत्साहन देणारे पालक समाजपरिवर्तनाचे खरे वाहक ठरतात. आज अनेक क्षेत्रांत महिलांनी उल्लेखनीय यश मिळविले आहे आणि त्यामागे त्यांच्या पालकांचे प्रोत्साहन आणि पाठबळ महत्त्वाचे ठरले आहे.

डिजिटल युगातील पालकत्व हा आधुनिक समाजासमोरील एक महत्त्वाचा विषय आहे. आजची मुले लहान वयापासूनच स्मार्टफोन आणि इंटरनेटच्या संपर्कात येत आहेत. यामुळे ज्ञानवृद्धीच्या संधी वाढल्या असल्या तरी व्यसनाधीनता, सायबर गुन्हे, ऑनलाइन छळ आणि सामाजिक माध्यमांचा अतिरेकी वापर यांसारख्या समस्या निर्माण झाल्या आहेत. अशा परिस्थितीत पालकांनी मुलांच्या ऑनलाइन क्रियाकलापांवर लक्ष ठेवणे, त्यांना सायबर सुरक्षिततेबद्दल माहिती देणे आणि तंत्रज्ञानाचा जबाबदारीने वापर करण्याचे शिक्षण देणे आवश्यक आहे.

मुलांच्या चारित्र्यनिर्मितीत पालकांचे योगदान अमूल्य आहे. समाजात वाढत असलेली हिंसा, भ्रष्टाचार, असहिष्णुता आणि नैतिक मूल्यांचा ऱ्हास लक्षात घेता मुलांमध्ये चांगल्या संस्कारांची रुजवात करणे अत्यंत आवश्यक आहे. सत्य, अहिंसा, प्रामाणिकपणा, परिश्रम, सहकार्य आणि मानवता यांसारख्या मूल्यांची शिकवण घरातूनच मिळाली पाहिजे. पालक स्वतःच्या आचरणातून मुलांसाठी आदर्श निर्माण करतात. मुलांना उपदेशापेक्षा उदाहरणांचा अधिक प्रभाव पडतो. त्यामुळे पालकांचे वर्तन आणि जीवनशैली मुलांच्या व्यक्तिमत्त्वावर थेट परिणाम घडवितात.

कामकाजी पालकांची संख्या वाढत असताना पालकत्वाची आव्हानेही बदलत आहेत. अनेक माता आणि पिता नोकरी, व्यवसाय आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या यांचा समतोल साधण्याचा प्रयत्न करतात. आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी दोघांनाही काम करावे लागते. अशा वेळी मुलांना पुरेसा वेळ देणे कठीण होते. परंतु मुलांसाठी केवळ आर्थिक सुविधा पुरेशा नसतात. त्यांना प्रेम, सहवास, संवाद आणि भावनिक आधाराचीही गरज असते. त्यामुळे पालकांनी आपल्या व्यस्त जीवनातून मुलांसाठी दर्जेदार वेळ काढणे आवश्यक आहे.

विशेष गरजा असलेल्या मुलांच्या संगोपनात पालकांचे योगदान विशेष गौरवास्पद असते. अशा मुलांच्या विकासासाठी अधिक संयम, वेळ आणि समर्पण आवश्यक असते. अनेक पालक सामाजिक आणि आर्थिक अडचणींवर मात करून आपल्या मुलांना शिक्षण, उपचार आणि स्वावलंबनाच्या संधी उपलब्ध करून देतात. त्यांचे कार्य समाजासाठी प्रेरणादायी आहे. अशा पालकांचा सन्मान आणि त्यांना आवश्यक ते सहकार्य करणे ही समाजाची जबाबदारी आहे.

पालक आणि मुलांमधील संवाद हा सुदृढ नात्याचा पाया आहे. बदलत्या जीवनशैलीमुळे आणि तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे अनेकदा संवादात अंतर निर्माण होते. परिणामी गैरसमज आणि भावनिक दुरावा वाढू शकतो. या समस्येवर मात करण्यासाठी पालकांनी मुलांशी मोकळेपणाने संवाद साधणे आवश्यक आहे. मुलांच्या विचारांचा आदर करणे, त्यांच्या प्रश्नांना उत्तरे देणे आणि त्यांच्या भावनांना महत्त्व देणे यामुळे विश्वासाचे नाते निर्माण होते. असे नाते मुलांच्या आत्मविश्वास आणि भावनिक विकासासाठी उपयुक्त ठरते.

वृद्धापकाळातील पालकांची काळजी घेणे हे प्रत्येक व्यक्तीचे नैतिक कर्तव्य आहे. बालपणी ज्यांनी आपल्या मुलांसाठी अथक परिश्रम घेतले, त्यांना वृद्धावस्थेत प्रेम, आदर आणि आधार मिळणे आवश्यक आहे. परंतु आधुनिक जीवनशैलीमुळे अनेक वृद्ध पालक एकाकीपणाचा सामना करताना दिसतात. काही वेळा त्यांना दुर्लक्षित केले जाते किंवा वृद्धाश्रमांचा आधार घ्यावा लागतो. ही स्थिती चिंताजनक आहे. पालकांचा सन्मान करणे, त्यांच्यासोबत वेळ घालविणे आणि त्यांच्या गरजांची काळजी घेणे हे केवळ कर्तव्य नाही तर संस्कारांचे प्रतीक आहे.



जागतिक पालक दिन हा केवळ उत्सव साजरा करण्याचा दिवस नाही; तो आत्मपरीक्षण करण्याचा दिवस आहे. पालकांच्या योगदानाची जाणीव करून घेणे, त्यांच्या त्यागाचे स्मरण करणे आणि त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करणे हा या दिवसाचा खरा उद्देश आहे. आपल्या जीवनातील प्रत्येक यशामागे पालकांचे मार्गदर्शन, प्रेरणा आणि आशीर्वाद असतात. त्यामुळे त्यांच्या योगदानाची कदर करणे आवश्यक आहे.

राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेत पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. उद्याचे नागरिक आजच्या घरांमध्ये घडत असतात. मुलांमध्ये देशप्रेम, सामाजिक जबाबदारी, लोकशाही मूल्ये आणि मानवतेची भावना रुजविण्याचे कार्य पालक करतात. सक्षम, सुसंस्कृत आणि जबाबदार नागरिक घडविणारे पालक हे खऱ्या अर्थाने राष्ट्राचे शिल्पकार असतात. समाजाचा विकास, राष्ट्रीय प्रगती आणि मानवी मूल्यांचे संवर्धन यामागे पालकांचे अप्रत्यक्ष परंतु प्रभावी योगदान असते.

आजच्या बदलत्या काळात पालकत्वाचे स्वरूप बदलत असले तरी त्याची मूलभूत मूल्ये कायम आहेत. प्रेम, त्याग, समर्पण, जबाबदारी, संरक्षण आणि संस्कार ही पालकत्वाची शाश्वत वैशिष्ट्ये आहेत. मुलांच्या आनंदात आनंद मानणारे, त्यांच्या यशासाठी स्वतःचे सुख बाजूला ठेवणारे आणि त्यांच्या भविष्यासाठी आयुष्यभर झटणारे पालक हे समाजाचे खरे आधारस्तंभ आहेत. त्यांच्या निःस्वार्थ प्रेमामुळेच मानवी जीवन अधिक सुंदर, सुरक्षित आणि अर्थपूर्ण बनते.

जागतिक पालक दिनाच्या निमित्ताने आपण प्रत्येकाने आपल्या पालकांविषयी आदर, प्रेम आणि कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे. त्यांना वेळ देणे, त्यांचे विचार ऐकून घेणे, त्यांच्या त्यागाची जाणीव ठेवणे आणि त्यांच्या सन्मानाचे रक्षण करणे हीच त्यांच्याप्रती खरी कृतज्ञता ठरेल. पालकांचा सन्मान जिथे केला जातो, तिथे संस्कार, मूल्ये आणि मानवता जिवंत राहतात. सुदृढ कुटुंब, सुसंस्कृत समाज आणि समृद्ध राष्ट्रनिर्मितीसाठी पालकांचे योगदान अनमोल आहे. म्हणूनच १ जूनचा जागतिक पालक दिन हा केवळ दिनविशेष नसून प्रेम, कृतज्ञता, संस्कार आणि मानवी नात्यांच्या अमूल्यतेची जाणीव करून देणारा प्रेरणादायी दिवस आहे. पालकांचे ऋण कधीही फेडता येत नसले तरी त्यांच्या त्यागाचा सन्मान करून, त्यांच्या मूल्यांचा वारसा जपून आणि त्यांच्या प्रेमाची कदर करून आपण त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करू शकतो. हाच जागतिक पालक दिनाचा खरा संदेश आणि सार आहे.

**- डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
**ईमेल** - bagate.rajendra5@gmail.com

**भारतीय राष्ट्रीय चित्रपट संग्रहालय येथे जागतिक सुलभता जागरूकता दिनानिमित्त**

# 'एन.एफ.डी.सी.' कडून 'सितारे जमीन पर' चित्रपटाच्या कलाकारांचा सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : खऱ्या अर्थाने सर्वसमावेशक चित्रपट परिसंस्थेला प्रोत्साहन देण्याच्या मुख्य उद्देशाने, राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळाने (एन.एफ.डी.सी.) शुक्रवार (चरू २९, २०२६) रोजी राष्ट्रीय भारतीय चित्रपट संग्रहालय (एन.एम.आय.सी.), मुंबई येथे क्रीडवर आधारित विनोदी आणि भावनिक 'सितारे जमीन पर' या चित्रपटाचे खास प्रदर्शन आयोजित केले आणि त्यानंतर त्या विषयावर तज्ञांची हृदयस्पर्शी चर्चा घडवून आणली. जागतिक सुलभता जागरूकता दिनानिमित्त आयोजित या परिसंवादात चित्रपटातील पाच अनोख्या तरुण कलाकारांवर विशेष प्रकाश टाकण्यात आला. पारंपरिक प्रश्नोत्तरांच्या स्वरूपापलीकडे जात, हे सत्र ''मने जोडणारा संवाद'' म्हणून पार पडले. या परिसंवादाचा विषय 'बियॉन्ड लेबल्स : अवर ड्रीम्स, अवर स्टोरीज' (ठराविक शिक्क्यांच्या पलीकडे: आपली स्वप्ने, आपल्या गोष्टी) असा होता.

गौरी नायर यांच्या नेतृत्वाखालील 'डिपार्टमेंट ऑफ मास्टरक्लासेस अँड पॅनेल सेशन्स' या विशेष मार्गदर्शन सत्रे आणि तज्ज्ञ परिसंवाद विभागा द्वारे आयोजित या सत्राची सुरुवात एन.एफ.डी.सी च्या भारतीय चित्रपटसृष्टीतील ५० वर्षांच्या योगदानाचा गौरव करणाऱ्या एका चित्रफितीने झाली. ''झितारेज् फ्रॉम मुंबई'' म्हणून ओळख करून देण्यात आलेल्या या तरुण कलाकारांमध्ये - आरुष दत्त (सतबीर), एक उत्कृष्ट अभिनेता आणि प्रेरक प्रभावी व्यक्तिमत्त्व ज्याने नुकतेच सामुदायिक समावेशकतेवर एक प्रभावी टेडएक्स भाषण दिले आहे; वेदांत शर्मा (बंटू), योग, नृत्य, आचारी, पोहणे असा बहुआयामी वावर असणारा आणि नुकताच 'इन्फ्लुएन्सर बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स' कडून 'रायझिंग इन्फ्लुएन्सर' म्हणून गौरवण्यात आलेला पदवीधर; संवित देसाई (करीम कुरेशी), एक पुरस्कार प्राप्त ओपन माइक सूत्रसंचालक आणि सकारात्मकता पसरवण्यासाठी ओळखला जाणारा जागतिक स्तरावरील गुणी कलाकार; सिमरन मंगेशकर (गोलू खान), या चमूतील प्रमुख महिला कलाकार, जिची मुख्य प्रवाहातील बॉलिवूडमधील पहिली दिव्यांग महिला अभिनेत्री म्हणून 'इन्फ्लुएन्सर बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स' मध्ये नोंद झाली आहे आणि जिने पहिल्या इन्का अवॉर्ड्स २०२६ मध्ये सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्रीचा पुरस्कार जिंकला आहे; आणि आयुष भन्साळी (लोटस), एक प्रशिक्षित कथ्थक आणि टॅप नर्तक, संगीतप्रेमी आणि प्राणिमित्र, ज्याने 'बेस्ट परफॉर्मन्स इन अन एन्सेंबल' आणि 'करेज इन सिनेमा अवॉर्ड' जिंकून सर्वांची मने जिंकलीष्ठ. यांचा समावेश होता. कर्करोगावर मात करणारे आणि दिव्यांगांच्या ऑलिंपिक स्पर्धेतील पदक विजेते ऋषी शहानी यांनी देखील प्रेक्षकांशी संवाद साधण्याची तळमळ जपत चित्रफितीद्वारे पाठवलेला हृदयस्पर्शी संदेश, या कार्यक्रमात दाखवण्यात आला. एन.एफ.डी.सी चे महाव्यवस्थापक (जी.एम) डी रामकृष्णन, या तरुण उत्सवमूर्तींचा औपचारिक सत्कार करण्यासाठी मंचावर उपस्थित होते. उपस्थितांना संबोधित करताना त्यांनी या कलाकारांनी मुख्य प्रवाहातील मनोरंजन विश्वातील विविध अडथळ्यांवर मात करून निर्माण केलेल्या प्रभावाचे आणि योगदानाचे विशेष कौतुक केले. त्यानंतर प्रेक्षकांना या कलाकारांशी थेट संवाद साधण्याची संधी देण्यात आली. या संवादात त्यांनी चित्रिकरणादरम्यानचे मजेदार अनुभव, त्यांच्या आवडी-निवडी, विचार, काम करताना आलेली आव्हाने आणि खऱ्या अर्थाने समावेशकतेविषयीची त्यांची भूमिका याविषयी मनमोकळेपणाने संवाद साधला. प्रत्येक वक्त्याने आपले वैयक्तिक अनुभव आणि विचार मांडले. त्यांच्या जिद्दीने, चिकाटीने आणि कलात्मक कौशल्याने उपस्थित प्रेक्षकांना प्रेरणा मिळाली. ''आजच्या संवादाचे खरे फलित म्हणजे समावेशकता आणि सकारात्मक परिवर्तनाच्या प्रवासात प्रत्येकाची भूमिका महत्त्वाची आहे, याची जाणीव. बदल घडवून आणण्यासाठी पुढाकार आपलाच असला पाहिजे; कारण आपणच त्या परिवर्तनाचे शिल्पकार आहोत, आपणच तो बदल आहोत.''कार्यक्रमाचा प्रभावी समारोप करताना 'एन.एफ.डी.सी.' ने या कलाकारांच्या यशामागे खंबीरपणे उभ्या असलेल्या त्यांच्या कुटुंबीयांप्रती मन:पूर्वक कृतज्ञता व्यक्त केली. या कलाकारांच्या आयुष्यातील खरे आधारस्तंभ असलेल्या कुटुंबीयांच्या नि:स्वार्थ प्रेम, अथक पाठबळ आणि अढळ विश्वासाचा आदर करत 'एन.एफ.डी.सी.' ने सिमरन, संवित, आरुष, वेदांत आणि आयुष यांच्या पालकांचा विशेष सत्कार केला. या परिसंवादानंतर शुक्रवारी संध्याकाळी 'सितारे जमीन पर' या चित्रपटाचा विशेष खेळ दाखवण्यात आला.



# पांडुरंग हरिदास यांचे निधन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : येथील पांडुरंग उर्फ शाम प्रभाकर हरिदास (वय ७९) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन भाऊ, एक मुलगा, सून, नातू असा परिवार आहे. पन्नास वर्षे त्यांनी वृत्तपत्र विक्रीचे काम केले होते. जेष्ठ वृत्तपत्र विक्रेते मुकुंद हरिदास यांचे ते थोरले बंधू होत.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे यांची जुगार अड्ड्यावर कारवाई; १३ लाख ६५ हजारांचा मुद्देमाल जप्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील मौजे खर्डी येथील खताळ वस्ती येथे काहीसं रमी नावाचा पत्त्याचा जुगार खेळत असली की माहिती मिळाली. माहिती बाबत पोलीस प्रशासनाने खात्री केली असता एका आंब्याच्या झाडाखाली मोकळ्या जागेत रात्री १०.४५ वाजता लाईटच्या उजेड्यात काहीसं जुगार खेळत असले जे निर्दशनास आले सदर ठिकाणी तात्काळ कारवाई करून तेरा लाख ६५ हजार १७० रुपये चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असल्याची माहिती सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे यांनी दिली.



सदर जागा हा संतोष सुखदेव खताळ यांच्या मालकीच्या असूनही जागा जुगार खेळण्याकरिता वापरण्यास दिल्याची समजते. कारवाईत ११,१७० रुपये रोख, सात मोबाईल, पत्त्याची पाने, दोन चार चाकी वाहन, तीन दुचाकी मोटरसायकल असा एकूण १३,६५,१७० चा मध्यमान जप्त करण्यात आला. यामध्ये खर्डी येथील संतोष सुखदेव खताळ वय वर्ष ३२ फिरोज इलाही आता ३८ वर्ष, मारुती नारायण अविन मत वय ३६ वर्ष, समाधान भारत वाकडे वय ३५ वर्ष, सिताराम मारुती चव्हाण वय ३८ वर्ष, तर असलम दाऊद शेख वय ३२ वर्ष, राहणार शेळवी कुलजित मारुती देशमुख वय ४० राहणार कासेगाव, दिगंबर लक्ष्मण पवार वय ५५ वर्ष राहणार अशा आठ जनावर कारवाई करण्यात आली.

सदर कामगिरी पोलीस हेड कॉन्स्टेबल श्री सर्जे पोलीस कॉन्स्टेबल श्री हुलजंती माने, भंडारवाड सावंत कुचेकर साठे लोखंडे सूर्यवंशी लोंढे यांनी केले असल्याची माहिती सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे यांनी दिली.

# अखिल शेतकऱ्यांच्या तक्रारीची दखल, कासेगावची कृषी सहाय्यक अमोल देवकर निलंबित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : दक्षिण सोलापूर तालुक्यातील कासेगाव येथील कृषी सहाय्यक अमोल नामदेव देवकर यांच्या विरोधात सुरू असलेल्या शिस्तबंगाच्या कारवाईच्या पार्श्वभूमीवर त्यांना निलंबित करण्यात आले आहे. पुणे विभागाचे विभागीय कृषी सहसंचालक यांनी २९ मे २०२६ रोजी हा आदेश जाहीर केला असून चौकशी पूर्ण होईपर्यंत त्यांच्यावर निलंबनाची कारवाई लागू राहणार आहे.

प्राप्त आदेशानुसार, कृषी विभागाच्या शिस्तभंग नियमानुसार अमोल देवकर यांच्या विरोधात विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आले आहे. चौकशी दरम्यान संबंधित अधिकारी पदावर राहिल्यास चौकशी प्रक्रियेवर परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेऊन त्यांना तात्काळ प्रभावाने निलंबित करण्यात आल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

निलंबन कालावधीत अमोल देवकर यांची मुख्यालय उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालय, सोलापूर येथे निश्चित करण्यात आले आहे. तसेच सक्षम अधिकारीच्या पूर्वपन परवानगीशिवाय मुख्यालय सोडण्यात त्यांना मनाई करण्यात आली आहे. शासनाच्या नियमानुसार त्यांना या कालावधीत निर्वाह भत्ता देण्यात येणार असल्याचेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

दरम्यान निलंबन कालावधीत कोणत्याही प्रकारची खाजगी नोकरी, व्यवसाय अथवा उद्योगधंद्यात सहभाग घेता येणार नाही,असेही आदेशात नमूद करण्यात आले संबंधित अधिकाऱ्यांनी या अटीचे पालन न केल्यास शासनाच्या नियमानुसार पुढील कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही देण्यात आला आहे.

कासेगाव परिसरातील काही दिवसापूर्वी शेतकऱ्यांची गैरवर्तन व उद्धट वर्तन केल्याच्या आरोप अमोल देवकर यांच्यावर करण्यात आला होता व या घटनेमुळे शेतकरी व ग्रामस्थांमध्ये जो नाराजी निर्माण झाली होती ग्रामस्थांनी संबंधित अधिकाऱ्यावर फोटोवर कारवाईची मागणी करत वरिष्ठ अधिकाऱ्याकडे निवेदने सादर केली होती यानंतर खुर्ची विभागाने या प्रकरणाची गंबर दखल घेत विभागीय चौकशी सुरू केली.

या निलंबनाच्या निर्णयामुळे शेतकरी व ग्रामस्थांच्या मागणीला काही प्रमाणात प्रतिसाद मिळाली की भावना व्यक्त होत असून आता विभागीय चौकशीच्या आव्हानुसार नेमके सत्य समोर येण्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# परिचारकांबाबत भाजप विचार करेल: आमदार श्रीकांत भारतीय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : भाजपमध्ये काम करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांना योग्य वेळी संधी दिली जाते. यामुळे विधान परिषद निवडणुकीसाठी माजी आमदार प्रशांतराव परिचारक यांचा भाजप विचार करील. असे आमदार श्रीकांत भारतीय यांनी सांगितले.

अधिक महिन्याच्या पार्श्वभूमी श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपूर येथे आले असता आमदार श्रीकांत भारती पत्रकारांशी बोलत होते. गेले अनेक वर्षापासून प्रशांत परिचारक भाजपमध्ये काम करीत आहेत सोलापूर जिल्ह्यामध्ये त्यांचे भाजपमध्ये चांगले काम आहे. त्यामुळे भाजप त्यांना विधान परिषदेसाठी उमेदवारी देण्याबाबत भाजप विचार करेल. श्रीकांत भारतीय मनाली की महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे चांगले काम करीत आहेत. त्यामुळे मराठा किंवा सर्व समाजाच्या कल्याणासाठी नेहमीच काम करत आहेत. त्यामुळे मनोज जरांगे पाटील हे अनेक नेत्यांच्या विश्वासात आहे. त्यामुळे योग्य मार्ग निघेल. असेही आमदार श्रीकांत भारती यांनी सांगितले.

# गावगाथा दिवाळी अंकाला राज्यस्तरीय मान्यता; 'आठवणीतील गाव' विशेषांकास उत्कृष्ट अंक निर्मितीचा उत्तेजनार्थ पुरस्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : ग्रामीण संस्कृती, परंपरा आणि गावकुसातील जिवंत आठवणींना शब्दबद्ध करणाऱ्या 'गावगाथा दिवाळी २०२५ - आठवणीतील गाव' या विशेषांकाला अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघ, पुणे यांच्या वतीने प्रदान करण्यात येणाऱ्या उत्कृष्ट ग्रंथ निर्मिती व दिवाळी अंक निर्मिती पुरस्कार सोहळ्यात विशिष्ट विषय विभागातील उत्तेजनार्थ पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. या सन्मानामुळे वागदरीसह अक्कलकोट तालुक्याच्या साहित्य व सांस्कृतिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



पुणे येथील मराठा चेंबर ऑफ कॉमर्स सभागृहात संपन्न झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात प्रसिद्ध गझलकार तथा महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कोषाध्यक्ष प्रदीप निफाडकर, कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. राजा दीक्षित तसेच ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत डॉ. न. म. जोशी यांच्यासह अनेक मान्यवर साहित्यिक उपस्थित होते.

यावेळी गावगाथा दिवाळी अंकाचे संपादक धोंडपा नंदे आणि सहसंपादक सदाशिव माळगे यांनी मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व सन्मानपत्र स्वीकारले. ग्रामीण जीवनातील हरवू लागलेल्या परंपरा, गावची सामाजिक-सांस्कृतिक जडणघडण, लोकसंस्कृती आणि जुन्या आठवणींचा ठेवा जपणाऱ्या 'आठवणीतील गाव' या विशेषांकाच्या विषयवैशिष्ट्याची परीक्षकांनी दखल घेत हा सन्मान प्रदान केला.

गेल्या चार वर्षांपासून गावगाथा दिवाळी अंक दरवर्षी वेगळा आणि वैशिष्ट्यपूर्ण विषय घेऊन प्रकाशित होत आहे. ग्रामीण भागातील दुर्लक्षित, काळाच्या पडद्याआड गेलेल्या विषयांवर प्रकाश टाकण्याचे कार्य या अंकातून सातत्याने केले जात आहे. अल्पावधीतच वाचकांच्या पसंतीस उतरलेल्या गावगाथा दिवाळी अंकाने आतापर्यंत तब्बल १५ राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त करून उल्लेखनीय यश संपादन केले आहे.ग्रामीण जीवनाचा इतिहास, संस्कृती आणि लोकपरंपरा जतन करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करणाऱ्या गावगाथाच्या या यशाबद्दल साहित्यप्रेमी, वाचकवर्ग तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून संपादक मंडळाचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# राजमाता अहिल्यादेवी होळकर यांना जयंतीनिमित्त अभिवादन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : ग्रामपंचायत गोगांव येथे लोककल्याण, न्यायप्रियता आणि आदर्श प्रशासनाचा वारसा जपणाऱ्या राजमाता अहिल्यादेवी होळकर यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले. त्यांच्या कार्यातून समाजसेवेची प्रेरणा सदैव मिळत राहो. यावेळी मान्यवराच्या हस्ते फोटो पूजन करण्यात आले.

यावेळी उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, सूर्यकांत जिरगे, प्रदीप जगताप, कोतवाल हनमंत जाधव , महंतेश कलशेट्टी, निवृती सुरवसे, आकाश गायकवाड, जगू सुरवसे, धोडेशा गुंजोटी, लक्ष्मण गायकवाड अमृत पाटील यासह मान्यवर उपस्थित होते

# खामसवाडी येथे अहिल्याबाई होळकर यांची जयंती उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हनुमंत पाटुळे/ खामसवाडी/प्रतिनिधी : कळंब तालुक्यातील खामसवाडी येथे मल्हार प्रतिष्ठानच्या वतीने राजमाता अहिल्याबाई होळकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी जयंतीचे औचित्य साधून जयंती कार्यक्रमात गावातील गुणवंत विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.




कार्यक्रमाच्या प्रारंभी अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शैक्षणिक व सेवाक्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला या मध्ये विश्वजीत काकासाहेब शेळके (महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा अधिकारी), अमृता वसंत यादव(भूमी अभिलेख कार्यालय बुलढाणा), काजल बालाजी जाधव( पुणे शहर पोलीस ठाणे), पृथ्वीराज प्रभाकर कदम(एच डी एफ सी बँक मुंबई शाखा अधिकारी) म्हणून निवड झाल्याबद्दल या सर्वांचा सत्कार खामसवाडी गावचे सरपंच अमोल पाटील, जिल्हा परिषदेचे समाज कल्याण सभापती विश्वास कोकणे, सोसायटी चेअरमन संजय पाटील, उपसरपंच दयानंद पाटील,माजी जिल्हा परिषद सदस्य वैभव मुंडे यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी किशोर शेळके, बाबासाहेब पाटील, श्याम पाटील, सतीश पाटील, दिनेश पाटील, सुशील शेळके, संजय राजमाने, शंकर तांदळे, कुलदीप घावटे, महादेव शेळके, सावता माळी, काकासाहेब शेळके, राजभाऊ गरड, मल्हार प्रतिष्ठानचे अध्यक्ष ज्ञानेश्वर बंडगर, बाबासाहेब बंडगर,अजय बडगर,रोहन बंडगर, ओम सौदागर, ओम कांबळे, गणेश सौदागर, बिरू सौदागर, बालाजी सौदागर, एकनाथ घाटुळे, शंकर वैद्य,कुलदीप घावटे, मिठु ताबारे,सतिश माने, संजय वैद्य, सुमित वाघे, प्रतीक बंडगर, पत्रकार हनुमंत पाटुळे, शिवाजी बोबडे, गोपाळ शेळके, दिपक सावंत यांच्या सह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवाजी बोबडे यांनी केले तर आभार ज्ञानेश्वर बंडगर यांनी मानले.

## विद्यार्थ्यांच्या परिश्रमाला प्राध्यापकांच्या योग्य मार्गदर्शनाची साथ

# स्वेरीच्या १७ विद्यार्थ्यांचे राष्ट्रीय पातळीच्या 'गेट' परीक्षेत उत्कृष्ट यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयामार्फत घेण्यात आलेल्या 'गेट' अर्थात 'ग्रॅज्युएट प्टिट्यूड टेस्ट इन इंजिनिअरिंग' या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. अत्यंत अवघड समजल्या जाणाऱ्या या परीक्षेत गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) मधील तब्बल १७ विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले असून यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी हे घवघवीत यश मिळविले आहे. या परीक्षेमध्ये संस्थेतील विद्यार्थ्यांनी उत्तम कामगिरी केली असून देशपातळीवर सर्वोच्च रँक ६४९ मिळवली आहे. यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये ओम राजू पाटील, सोहम चेतन कुलकर्णी, अनुष्का शहाजी घोडके, आदेश बाळासाहेब कोंढारे, वैष्णवी विलास मस्के, विवेक बंडू पवार, ओंकार बापुसो देशमुख, समर्थ महेश मोटे, आकाश नवनाथ चव्हाण, जय बाळासाहेब जाधवर, तुषार शंकर कर्डुले, भाग्यवान सुनील सायकर, संकेत रावसाहेब मोरे, श्रेयश दशरथ लोकरे, रणजीत कमलाकर धनवडे, आदेश दत्तात्रय देठे व रोहन राजेश ताटीपामल या १७ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. यातील कांही विद्यार्थ्यांनी दोन स्वतंत्र पेपर देऊन अधिक यश मिळवले आहे.

**प्रथम वर्षापासून घेतलेल्या नाईट स्टडी व आयोजित केलेले गेस्ट लेक्चर्स यांचा गेट परीक्षेत यशस्वी होण्यासाठी खूप फायदा झाल्याचे या यशस्वी विद्यार्थ्यांनी सांगितले.**

स्वेरीच्या वतीने घेण्यात येत असलेल्या सातत्यपूर्ण सराव सत्रांमुळे आणि उच्चशिक्षित प्राध्यापकांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांच्या कठीण परिश्रमाला अभूतपूर्व यश मिळाले आहे. यापूर्वी देखील संस्थेचे अनेक विद्यार्थी 'गेट' परीक्षेतील गुणांच्या आधारे देशातील नामांकित आयआयटी, आयआयएससी आणि एनआयटी यांसारख्या संस्थांमध्ये उच्च शिक्षणासाठी प्रवेश मिळवण्यात यशस्वी झाले आहेत तसेच अनेक विद्यार्थ्यांनी या परीक्षेच्या माध्यमातून पीएसयु अर्थात सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमामध्ये प्रतिष्ठेच्या नोकऱ्या मिळवून संस्थेचा नावलौकिक वाढवला आहे. विद्यार्थ्यांना या कठीण परीक्षेची तयारी सोपी जावी यासाठी संस्थेमार्फत वर्षभर विशेष उपक्रम राबवले जातात. यामध्ये गेट, गव्हर्मेंट एक्झाम, कॅट अशा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील विविध परीक्षांचा समावेश आहे. याचबरोबर विद्यार्थ्यांची ॲप्टीटयूड, सॉफ्ट स्किल, कम्युनिकेशन, मागील वर्षांच्या प्रश्नपत्रिकांचे सखोल विश्लेषण, ग्रुप डिस्कशन आणि मुलाखत प्रक्रियेसाठी तयारी करून घेतली जाते. या माध्यमातून विद्यार्थ्यांना अशा प्रकारच्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील करिअरच्या संधी उपलब्ध होत आहेत. या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक व प्राचार्य डॉ. बी.पी.रोंगे, संस्थेचे अध्यक्ष अशोक भोसले, उपाध्यक्ष सुरेश राऊत, सचिव डॉ. सुरज रोंगे, संस्थेचे इतर पदाधिकारी व विश्वस्त, सर्व संचालक मंडळ, बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ. एम. जी. मणियार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. एन.डी.मिसाळ, डी.फार्मसीचे प्राचार्य डॉ. एस. व्ही. मांडवे, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, इतर अधिष्ठाता, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.




# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते श्रीराम अर्बन को-ऑप. बँक लिमिटेडच्या चिंचभवन शाखेचे उद्घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज श्रीराम अर्बन को- ऑपरेटिव्ह बँक लिमिटेडच्या चिंचभवन शाखेचे उद्घाटन करण्यात आले. चिंचभवन येथील काचोरे पाटील नगरात या बँकेच्या ६ व्या शाखेच्या उद्घाटनप्रसंगी महसूल मंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार प्रवीण दटके, माजी आमदार संदीप जोशी, महापौर नीता ठाकरे, मनपा आयुक्त डॉ. विपीन इटनकर, श्रीराम अर्बन को- ऑप. बँक लि.चे अध्यक्ष पराग सराफ, उपाध्यक्ष अजित गोकर्ण आदी यावेळी उपस्थित होते. यावेळी बँकेचे अध्यक्ष पराग सराफ यांनी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांना बँकेच्या प्रगती विषयी माहिती दिली तसेच संचालक मंडळाचा परिचय करून दिला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बँकेच्या नवीन शाखेला आणि संपूर्ण संचालक मंडळ व अधिकारी-कर्मचाऱ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# बुलेटच्या धडकेणे देवडी गावाच्या हद्दीत एकाचा मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पुरंदर प्रतिनिधी/ डॉ. विनायक गायकवाड : नारायणपूर-कापूरहोळ मार्गावर देवडी गावच्या जवळ झालेल्या दुचाकी अपघातात स्कूटरवर मागे बसलेल्या ५५ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाला असून, अपघातास कारणीभूत ठरलेल्या बुलेटचालकाविरुद्ध सासवड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

धोंडिबा मालू हिरवे (रा. जांभळी, ता. वाई, जि. सातारा) हे गुरुवारी (दि. २१) रोजी दुपारी ४ बाजण्याच्या सुमारास स्कूटरवर मागे बसून नारायणपूरहून कापूरहोळकडे जात होते. त्या वेळी त्यांच्या दुचाकीच्या पाठीमागून भरधाव वेगाने आलेल्या मोटारसायकलने (एमएच १२ डब्ल्यूवाय ०००६) जोरदार धडक दिली. या धडकेत धोंडिबा हिरवे यांना डोक्याला गंभीर दुखापत झाली. तसेच शरीराच्या इतर भागांनाही गंभीर व किरकोळ जखमा झाल्या. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. अपघातानंतर संबंधित बुलेटचालकाने जखमींना मदत न करता अथवा पोलिसांना माहिती न देता घटनास्थळावरून पलायन केल्याचा आरोप फिर्यादित करण्यात आला आहे.

या प्रकरणी शंकर धोंडिबा हिरवे यांनी सासवड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तेजस संतोष कन्हाडे (रा. शेटेमळा, सासवड, ता. पुरंदर) याच्याविरुद्ध निष्काळजीपणे व भरधाव वेगाने वाहन चालवून अपघात घडवून मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, नारायणपूर-कापूरहोळ मार्गावरील वाढत्या वेगवान वाहतुकीबाबत नागरिकांनी चिंता व्यक्त केली आहे. अपघातानंतर वाहनचालकांनी वेगमयदिचे पालन करावे, तसेच अपघातग्रस्तांना तातडीने मदत करण्याची सामाजिक जबाबदारी पार पाडावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे. सासवड पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक कुमार कदम साहेब यांच्या मार्गदर्शना खाली ट्राफिक हवालदार संतोष शिंदे या प्रकरणाचा पुढील तपास करीत आहेत.

# आ. अभिजीत पाटील यांनी मंजूर केलेल्या शक्तिपीठमार्गाला माढा तालुक्यातून विरोध; पोलिसांनी ५० शेतकऱ्यांना घेतले ताब्यात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : शक्तिपीठ महामार्गासाठी माढा तालुक्यातील धानोरी येथे शक्तीपीठ साठी मोजणी शेतकऱ्याला मोजणीला विरोध. जी-पीएल मशीन ची नुकसान केले. याप्रकरणी ५० शेतकऱ्यांना ताब्यात घेतले आहे. यामुळे आमदार अबीर पाटील यांची भूमिका निर्णायक ठरणार आहे



माढा मतदारसंघातून शक्तीपीठ महामार्ग जावयासाठी आमदार अमित पाटील यांनी विधानसभेत आवाज उठवला होता. महामार्गामुळे आर्थिक फायदा होणार आहे. यामुळे शक्तिपीठ महामार्गामुळे शेतकऱ्यांनी विरोध दर्शवला आहे. जमिनी देण्यास शेतकऱ्यांनी नकार दिला आहे. बार्शी तालुक्यातील मोजणी पूर्ण झाली आहे. यानंतर अधिकाऱ्यांनी माढा तालुक्यातील धानोरी या गावात मोजणी सुरू केली. यावेळी प्रांताधिकारी जयश्री आव्हाड, तहसीलदार संजय भोसले आदी उपस्थित होते. यावेळी शेतकऱ्यांनी जमीन मोजण्यास नकार देऊन व मुलीसाठी आणले जीपीएल मशीन याची मोडतोड करण्यात आली. याची गंभीर दखल घेऊन पन्नास शेतकऱ्यांना ताब्यात घेतली आहे.

आमदार अभिषेक पाटील यांनी शक्तीपीठ महामार्ग माढ्यातून जावा यासाठी प्रयत्न केले होते. मात्र याच मतदारसंघातील शेतकऱ्यांनी विरोध दर्शवला आहे. यामुळे आता आमदार अभिजीत पाटील यांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.

# ईटकूर येथे अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**


ईटकूर प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे : कळंब तालुक्यातील ईटकूर येथे पूण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंती निमित्त विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरात मूर्ती पूजन करण्यात आले.

यावेळी जिल्हा परिषद सदस्य अनंत लंगडे पंस माजी उपसभापती लक्ष्मन आडसुळ, मा.उपसरपंच आबासाहेब फरताडे, महादेव पावले, पंडित गोडगे, प्रदिप फरताडे, सत्यदेव जगताप, अमरसिंह आडसुळ, बाळासाहेब गंभिरे, जेष्ठ नागरिक अरुण बावळे, विनोद चव्हाण, प्रतिक आडसुळ संदिप आडसुळ, पत्रकार सुधाकर रणदिवे, पत्रकार अमोल रणदिवे ह भ प बाळासाहेब माने, ह भ प पवण दादा आडसुळ यांच्या सह अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सव समितीचे पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चिक्केहळ्ळी गावात विहिरीत पडलेल्या बैलाला जीवदान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

चिक्केहळ्ळी : चिक्केहळ्ळी गावात घडलेली ही घटना खरोखरच माणुसकीचा आदर्श ठरावी अशी आहे. विहिरीत पडलेल्या मुक्या बैलाचा जीव वाचवण्यासाठी श्री.सागर दादा कल्याणशेट्टी यांनी दाखवलेली तत्परता आणि नेतृत्व कौतुकास्पद आहे.



माणुसकी हीच खरी ओळख

चिक्केहळ्ळी गावातील एका बैलाचा अपघात होऊन तो विहिरीत पडला. या घटनेची माहिती मिळताच श्री.सागर दादा कल्याणशेट्टी यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी केवळ मदत करण्याचे आवाहनच केले नाही, तर संपूर्ण बचावकार्याचे नेतृत्व स्वतः हाती घेतले. विविध यंत्रणांमध्ये समन्वय साधत, ग्रामस्थांना सोबत घेत आणि योग्य नियोजन करून त्यांनी बैलाला सुरक्षितपणे विहिरीबाहेर काढण्याचे कार्य यशस्वी केले.

आजच्या काळात अनेकजण समस्या पाहून पुढे निघून जातात, परंतु सागर दादांनी एका मुक्या प्राण्याचा जीव वाचवण्यासाठी दाखवलेली संवेदनशीलता आणि जबाबदारी ही प्रेरणादायी आहे. त्यांच्या या कृतीतून प्राणीमात्रांविषयीची करुणा, समाजाप्रती असलेली बांधिलकी आणि संकटसमयी नेतृत्व करण्याची क्षमता दिसून येते.

श्री.सागर दादा कल्याणशेट्टी यांचे हे कार्य केवळ एका बैलाचे प्राण वाचवण्यापुरते मर्यादित नसून, समाजात माणुसकी, दयाभाव आणि सेवाभाव जिवंत असल्याचा संदेश देणारे आहे. त्यांच्या या कार्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन व हार्दिक कौतुक.

नेतृत्व म्हणजे केवळ आदेश देणे नव्हे, तर संकटात स्वतः पुढे येऊन जबाबदारी स्वीकारणे होय; आणि हेच सागर दादांनी आपल्या कृतीतून सिद्ध केले.

मुक्या जीवांचे रक्षण हीच खरी मानवता...!!!

# पडघा महामार्गालगतचा आठवडा बाजार ठरतोय धोक्याचा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील पडघा-शेरेकरपाडा येथे मुंबई-नाशिक महामार्गाच्या अगदी कडेला भरणारा रविवारचा आठवडा बाजार नागरिकांच्या जिवावर बेतण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सुक्या मासळीसह जीवनावश्यक वस्तूंच्या खरेदीसाठी येणाऱ्या ग्राहकांची मोठी गर्दी, महामार्गावरच केले जाणारे बेशिस्त पार्किंग आणि रस्त्याच्या कडेला ठाण मांडून बसलेले विक्रेते यामुळे दर रविवारी येथे वाहतूक कोंडी व अपघाताचा धोका निर्माण होत आहे. स्थानिक नागरिकांच्या मते, महामार्गावरून भरधाव वेगाने जाणाऱ्या वाहनाचा चालकाचा ताबा सुटल्यास वाहन थेट बाजारातील गर्दीत घुसून मोठी दुर्घटना घडू शकते. त्यामुळे येथील सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या धोक्याची दखल घेत 'वाहुली गाव विकास प्रतिष्ठान' या सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुरेश शिंदे व सहसचिव गणेश मते यांनी दोन वर्षे पूर्वी पडघा ग्रामपंचायत, भिवंडीचे तहसीलदार व पडघा पोलीस ठाणे यांना लेखी निवेदन देऊन बाजार अन्यत्र स्थलांतरित करण्याची मागणी केली होती. त्यानंतर भादाणे ग्रामपंचायतीचे सदस्य महेश वावरे यांनीही एक वर्षापूर्वी पडघा ग्रामपंचायतीकडे निवेदन दिले होते.

**रस्त्यावरच गर्दी व बेशिस्त पार्किंगमुळे अपघाताची भीती; प्रशासनाच्या दुर्लक्षाबद्दल नागरिकांत संताप**

वृत्तपत्रात बातमी प्रसिद्ध झाल्यानंतर ग्रामपंचायतीने विक्रेत्यांना तात्पुरती समज दिली व कारवाईचे फलक लावले. मात्र पुन्हा आठवडा बाजार महामार्गाच्या कडेला पूर्ववत भरू लागला. सध्या दर रविवारी शेरेकरपाडा येथे 'जैसे थे' परिस्थिती दिसून येते. या गंभीर प्रश्नाकडे पडघा ग्राम पंचायत व पडघा पोलिस प्रशासन गांभीर्यपूर्वक लक्ष देतील का ? अशी चर्चा नागरिकांत सुरू आहे. उद्या अपघात झाल्यास जबाबदार कोण? असा संतप्त सवाल पडघा येथील ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे. नागरिक व सामाजिक संस्थांनी बाजारासाठी सुरक्षित व पर्यायी जागा उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. रविवारच्या गर्दीच्या वेळी वाहतूक पोलिस नेमणे, बॅरिकेड्स लावणे किंवा बाजार पूर्णपणे स्थलांतरित करणे, यापैकी तातडीने मार्ग काढावा, अशी आग्रही मागणी होत आहे. पडघा ग्रामपंचायत व पोलिस प्रशासनाने संयुक्तपणे ठोस उपाययोजना करावी, याकडे संपूर्ण पडघे परिसराचे लक्ष लागले आहे.

# जीवनात मोठे कार्य करायचे असेल तर शिक्षण हाच परिवर्तनाचा पाया आहे : प्रवीण बागडे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




नागपूर : नागपूरच्या लष्करीबाग येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मिशन सभागृहात बहुजन हिताय संघाची ४७२ वी साप्ताहिक सभा शनिवारी (दि. ३०) उत्साहात संपन्न झाली. सभेच्या अध्यक्षस्थानी प्रशासनिक अधिकारी, साहित्यिक व स्वतंत्र लेखक आयु. प्रवीण बागडे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून सामाजिक न्याय विभागाचे माजी उपायुक्त आयु. संजीव गाडे उपस्थित होते. याप्रसंगी बहुजन हिताय संघाचे अध्यक्ष तथा आंबेडकरी विचारवंत डॉ. शंकर खोब्रागडे व आयु. राजेंद्र गजभिये प्रज्ञापीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात तथागत गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून त्रिशरण, पंचशील व बुद्धवंदनेने करण्यात आली. अध्यक्ष प्रवीण बागडे यांनी उपस्थितांकडून आनापानसती साधना करून घेतली, तर प्रमुख अतिथी संजीव गाडे यांनी बावीस प्रतिज्ञा वदवून घेतल्या. तसेच मनोगत व्यक्त करताना त्यांनी हिस डेव्हिड यांच्या जीवनकार्याचा आढावा घेत बौद्ध धम्माच्या जागतिक प्रसारासाठी त्यांनी दिलेल्या योगदानावर प्रकाश टाकला.

संस्थेचे सन्माननीय अध्यक्ष डॉ. शंकर खोब्रागडे यांनी यकृताचे आरोग्य, फॅटी लिव्हर, लिव्हर कॅन्सर, मधुमेह, हृदयविकार आणि त्यावरील प्रतिबंधात्मक उपाय याविषयी मार्गदर्शन केले. जागतिक तंबाखूमुक्त दिनानिमित्त तंबाखू सेवनाच्या दुष्परिणामांबाबतही जनजागृती करण्यात आली. बहुजन हिताय संघाचे उपाध्यक्ष बौद्धाचार्य प्रकाश सोनटक्के यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा आढावा घेतला. सुत्तपठणादरम्यान रविंद्र हुमणे यांनी धम्मविषयक मार्गदर्शन केले. प्रथमच सभेला उपस्थित राहिलेल्या आयु. प्रभाकर सोमकुवर यांनी संघाच्या धम्म, समाजप्रबोधन व सामाजिक कार्याचे कौतुक केले.

अध्यक्षीय मनोगतात प्रवीण बागडे यांनी शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करताना, जीवनात काही मोठे कार्य करायचे असेल तर सर्वप्रथम शिक्षित होणे आवश्यक आहे. शिक्षण क्षेत्रातील वाढते बाजारीकरण ही चिंतेची बाब असून तरुणांनी या विषयावर गंभीरपणे विचार करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन केले. तसेच बहुजन हिताय संघासारख्या संस्था समाजजागृतीचे महत्त्वपूर्ण कार्य करीत असून अशा सभा समाजपरिवर्तनाची शाळा असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आयु. राजेंद्र गजभिये यांनी केले, तर आभार प्रदर्शन आयु. माया बोंदाडे यांनी मानले. समापन गाथा प्रा. नंदाताई भगत यांनी सादर केली. वर्षाताई टेंभेकर, मंगलाताई राऊत व संगीताताई पानतावणे यांनी राष्ट्रगीत सादर करून कार्यक्रमाची सांगता केली.

**४-५ तास होतात उशिरा, प्रवाशांच्या जिवाशी खेळ**

**प्रवाशांना बसतोय फटका**

# अबब.... ५.३० वाजताची प्रवासी रेल्वे सुटते रात्री १०.१० वाजता

## प्रवाशांनी आऊटर स्टेशन मास्टरला दिला दम : बल्लालशाह रेल्वे सुटली रात्री १२.३० वा. तब्बल ७ तास उशीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुन्नाभाई नंदागवळी/बाराभाटी : अनेक वर्षांपासून गोंदिया ते बल्लरशाह ही प्रवासी रेल्वे धावत आहेत.

रेल्वे विभागाच्या मालगाडी व सुपरफास्ट एक्सप्रेस ह्यांना क्षणात करण्यासाठी सायंकाळची ५.३० वाजताची रेल्वे ही रात्री १०.१० वाजता सोडून आऊटरवर तब्बल दोन तास थांबविली. हा कोणता अनागोंदी कारभार करतात रेल्वे विभागाचे अधिकारी काही समजत नाही. म्हणून अबब.... ५.३० वाजताची प्रवासी रेल्वे सुटते रात्री १०.१० वाजता...! जनतेचा कोण वाली? असे प्रश्न उपस्थित केले.



मे महिन्यात संपूर्ण महीना ही रेल्वे ५ तास अशी खुप उशिर करायची यामुळे प्रवाशांना अतिशय त्रास सहन करावा आजही लागत आहे. ही समस्या तातडीने सोडवुन नेहमी असणारी वेळ याच वेळेवर दररोज सोडावी. अशी मागणी प्रवासी करीत आहेत. परंतु मागणी पूर्ण केली जात नाही.

द. ३० मे २०२६ ला सांयकाळी सुटणारी बल्लालशाह ही रेल्वे रात्री १२.३० गोंदिया वरुन निघाली तर ती पहाटे ६ वाजता चांदाफोर्ट पोहोचली. प्रवासी पॅसेंजर जर सात तास उशिरा सोडली जात असेल तर प्रवाशांची रेल्वे बंदच करावी आणि रेल्वे विभाग कायमचा बंद करावा.

आऊटर स्टेशन मास्टरला दिला दम

रात्री १०.१० वाजता सुटलेली रेल्वे पुन्हा दोन तास आऊटरवर विनाकारण थांबवून ठेवली. यावेळी रेल्वेमधील प्रवाशांनी उतरुन सदर स्टेशन मास्टरला चांगलाच झापून दनका देत दम दिला. प्रवाशांनी रेल्वे नियंत्रक नागपूर यांनाही फोनवर योग्य शब्दात दनका दिला. यामध्ये ५० लोकांचा समुह जमा झाला होता.

गोंदिया बल्लरशाह या मार्गावर तब्बल दिवसातून ४ रेल्वे धावत असतात. तसेच बल्लरशाह वरुन गोंदियाकडे ४ गाड्या धावत आहेत. परंतु या मार्गावर दररोजच माल वाहून नेणाऱ्या गाड्या आधी पास करतात. तसेच सुपरफास्ट एक्सप्रेस या गाड्या सुध्दा आधी पास करता असतात. यामुळे आणखीन उशिरा लोकल गाडी मुद्दाम उशिरा सोडतात. हे सबंधित विभागाचे चुकीचे आहे.

लोकल पॅसेंजर गाड्या ह्या वेळेवर सोडायला हवी. जेणेकरून प्रवास करणारे प्रवासी हे आपले काम पूर्ण करतील. कारण कर्मचारी, शिक्षक, व्यवसायीक, विद्यार्थी, प्रशिक्षणार्थी, धंदेवाईक यांची कामात फारच बदल होतो. याला जबाबदार रेल्वे विभाग आहे.

**रेल्वे विभागाच्या अशा कारभारामुळे आम्ही नोकरी करताना त्रासलो. नियंत्रक अधिकारी आपली मनमर्जी करतात. मालगाडी व सुपरफास्ट एक्सप्रेस अगोदर सोडायला लावतात. यावर काय पर्याय करावा. समजत नाही. जनतेचे हालबेहाल होतात. याची नियंत्रकाना काही काळजी नाही.**

**– स्टेशन मास्टर, आऊटर कॅबीन यार्ड, गोंदिया (सटवा डव्वा)**

### बल्लालशाह ७ तास उशिरा

**गोंदिया ते बल्लालशाह ही सायंकाळची ७ तास उशिरा सोडण्यात आली. अशावेळी प्रवाशांची मोठीच गैरसोय झाली. पिण्याचे पाणी नाही. खायलाही काही नाही. यात काय करावे जनतेने मोठी समस्या निर्माण झाली, पण रेल्वे विभाग झोपून आहे.**